# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन माझी वसुंधरा अभियानात सहभागी व्हा

## पर्यावरण संवर्धनासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

पर्यावरण संवर्धन, हवामान बदल नियंत्रण आणि हरित जीवनशैलीचा प्रसार या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या “माझी वसुंधरा” या उपक्रमात ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून नागरिकांमध्ये वसुंधरा संवर्धन, हरित सवयी आणि जबाबदार नागरी सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. तसेच माझी वसुंधरा अभियानामध्ये जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधून विशेष कार्ययोजना आखण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालये, उद्योगसंस्था, महिला बचत गट, रहिवासी संघटना आणि सामाजिक संस्था यांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून प्रोत्साहित केले जात असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता या मोहिमेचा भाग म्हणून शहरातील नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प करून आपल्या कृतीतून निसर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच या अभियानांतर्गत नागरिकांनी झाड लावताना, वृक्षारोपण करताना किंवा हरित उपक्रमात सहभागी होताना एक फोटो घेऊन तो सोशल मीडियावर अपलोड करावा आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया पेजेसना टॅग करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड शहराने ‘हरित जीवनशैली’ अंगीकारण्यासाठी पुढाकार घेतला असून ‘माझी वसुंधरा ६.०’ अभियानामुळे नागरिकांना पर्यावरणपूरक विचार आणि कृतींचे प्रात्यक्षिक देण्याची उत्तम संधी मिळते. महापालिका प्रशासन, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास पिंपरी चिंचवड शहर राज्यातील आदर्श, सुंदर, हरित शहर ठरू शकेल.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### अशी घ्या प्रतिज्ञा..

- सर्वप्रथम https://majhivasundhara.in या संकेतस्थळाला भेट द्या.
- मराठी / इंग्रजी यापैकी मराठी भाषा निवडा.
- तुमच्या स्क्रीनवर दिसणारा ‘हरित शपथ’ हा पर्याय क्लिक करा.
- त्यानंतर ‘त्वरित तुमची ई-प्लेज घ्या’ या पर्यायावर क्लिक करा.
- ‘पुढे जा’या पर्यायावर क्लिक करा.
- ‘वैयक्तिक / सामूहिक’यापैकी एक पर्याय निवडून ‘सादर करा’ या पर्यायावर क्लिक करा.
- तुमच्या स्क्रीनवर दिसणारा प्रतिज्ञा अर्ज भरून ‘सादर करा’ या पर्यायावर क्लिक करा.

---

# पाण्याच्या चुकीच्या वेळा अन् कमी दाबाने पाणी; नागरिक त्रस्त

## रूपीनगरमधील परिस्थिती, भर पावसाळ्यात नागरिकांची पाण्यासाठी कसरत

**पिंपरी | प्रतिनीधी**

शहराला पाणीपुरवठा करणारे पवना धरण तुडूंब भरलेले असताना रूपीनगर परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो आहे. पाणीपुरवठा विभागाकडून निम्म्या रात्री,पहाटे अशा अवेळी पाणी सोडले जाते, त्यात कमी दाबाने येणाऱ्या पाण्यामुळे तासन्तास ताटकळत उभे रहावे लागते, काही ठिकाणी पाणीच मिळत नसल्याने टॅंकरने पाणी मागवावे लागते अशा तक्रारी परिसरातील नागरिकांकडून केल्या जात आहेत.

गेल्या काही दिवसांपासून रूपीनगर परिसरात वारंवार पाणीटंचाई निर्माण होत आहे, तर काही भागात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून नियमित पाणीपुरवठा न झाल्याने, तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा होते आहे. त्यामुळे नागरिकांना महापालिकेच्या टॅंकरमधून पाणी मागवावे लागत आहे. रूपीनगर मधील बैठी घर, स्वराजपार्क, राजमाता सोसायटीसह इतर सोसायट्यांना त्रास सहन करावा लागतो आहे. ग्राउंड फ्लोअरच्या नागरिकांनाही पाणी मिळत नाही. पाण्याचे प्रेशर कमी असल्याने पाण्याचा तुटवडा भासतो आहे.



> दिवाळीच्या पाच ते सहा दिवस आधीपासून रावेत, सेक्टर २३ मध्ये पाण्याचा प्रॉब्लेम झाला. पाण्याच्या लाईन फुटल्या, तिकडे समस्या आली की, कृष्णानगरच्या टाक्या भरण्यास उशिर होतो. जोपर्यंत तिकडचे पाणी सुरुळीत होत नाही, तोपर्यंत टाक्या भरता येत नाही. वरतून एक दिवस पाणी नाही मिळाले की, ज्या भागाचा पाण्याचा वार असतो तिथे अडचण येते. मात्र आजपासून सुरुळीत होईल. नागरिकांना समस्या येणार नाहीत.
>
> **- जयकुमार गुजर, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग.**

> रूपीनगर परिसरातील पाण्याचे अनियमित वेळापत्रक नागरिकांना त्रासदायक आहे कारण यामुळे दैनंदिन गरजा भागवणे कठीण होते, विशेषतः वृद्ध आणि लहान मुले असलेल्या कुटुंबांसाठी ही समस्या अधिक गंभीर बनते. कमी दाबामुळे पाणी भरण्यासाठी जास्त वेळ लागतो आणि त्यामुळे गैरसोय होते. टॅंकरने पाणी भर पावसाळ्यात मागविणे म्हणजे धरण उशाला अन् कोरड घशाला अशी परिस्थिती झाली आहे. त्यामुळे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने व्यवस्थित वेळापत्रक तयार करून पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करावा, म्हणजे नागरिकांना दिलासा मिळेल.
>
> **- शरद भालेकर, स्थानिक.**

> ऐन दिवाळीच्या सणाच्या सुरुवातीपासून रूपीनगरमध्ये पाण्याच्या समस्या सुरु झाल्या आहेत. कमी दाबाने पाणी, अवेळी पाणी सोडणे त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. पाणीपुरवठा विभागाने सुरुळीत पाणी पुरवठा करून नागरिकांना दिलासा द्यावा.
>
> **- शितल वर्णेकर, स्थानिक.**

# घरातील पाण्याच्या टाकीत बुडून 'वरमाई'चा मृत्यू

## लग्नघरात शोककळा; अवघ्या तीन दिवसांवर आले होते मुलाचे लग्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

अवघ्या तीन दिवसांवर मुलाचे लग्न... दारावर तोरणे झळकत होती, स्वयंपाकघरात लग्नाच्या जेवणाचा सुगंध दरवळत होता आणि घरात पाहुण्यांच्या हसऱ्या गप्पांचा गजबजाट होता. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळंच लिहिल होते. लग्नाच्या तयारीत सुरू असलेल्या धावपळीतच पाण्याच्या टाकीत पडून वरमाई म्हणजेच नवऱ्या मुलाच्या आईचा मृत्यू झाला. आनंदात न्हाऊन निघालेले गवळी कुटुंब एका क्षणात शोकसागरात बुडाले. चिंचवड येथील मोहननगर परिसरात शुक्रवारी (दि. ३१) सकाळी ही हृदयद्रावक घटना घडली.





आशा संजय गवळी (५२, रा. मोहननगर, चिंचवड) असे मृत्यू झालेल्या वरमाईचे नाव आहे. आशा गवळी या गृहिणी होत्या. तर त्यांचे पती पुण्यातील शाळेत कर्मचारी आहेत. मूळ इंदापूर तालुक्यातील असलेल्या गवळी दांपत्याने दोन्ही मुलांना इंजिनिअर बनवण्यासाठी आयुष्यभर झगडत संसार उभा केला. मोठा मुलगा संसारात स्थिरावला असून त्याला एक मुलगाही आहे. धाकट्या मुलाचे लग्न येत्या ४ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर येथे होणार होते, तर ३ नोव्हेंबरला साखरपुडा ठरला होता. घरात धार्मिक विधी सुरू होते; पाहुण्यांची ये-जा, खरेदी, कपडे-दागिन्यांची तयारी यामुळे वातावरण उत्साहाने भारलेले होते.

दरम्यान, शुक्रवारी देवीचा वार असल्याने घरात 'सुवासिनींचे जेवण' ठेवण्यात आले होते. स्वयंपाकाची लगबग सुरू असतानाच पाण्याची टंचाई जाणवली. त्यामुळे वरमाई आशा गवळी या पाण्याची बादली भरायला टाकीजवळ गेल्या. झाकण उघडून बादली टाकताना त्यांचा तोल गेला आणि त्या टाकीत पडल्या. काही वेळानंतर नवऱ्या मुलाला आई दिसत नसल्याने त्याने शोध घेण्यास सुरुवात केली. टाकीचे झाकण उघडे दिसल्याने मनात शंका आली. आत डोकावल्यावर समोर आईचे निष्प्राण शरीर दिसले. हे दृश्य पाहताच बोहल्यावर चढण्यासाठी सज्ज झालेल्या मुलाने अक्षरशः टाहो फोडला. "आई... उठ ना... माझ लग्न आहे..." असा हंबरडा फोडत तो खाली बसला. शेजाऱ्यांनी धाव घेत आशाताईंना बाहेर काढले. त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले; मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची बातमी पसरताच मोहननगर परिसर शोकमग्न झाला. आयुष्यभर ज्यांनी मुलांच्या भवितव्यासाठी संसाराची प्रत्येक वीट रचली, त्या आईला आपल्या मुलाच्या कपाळावर मुंडावळ्या बांधलेला पाहायचाही योग आला नाही. लग्नघरातील सजावट उतरवण्यात आली, दिव्यांचा प्रकाश मंदावला आणि रडण्याचे हुंदके अंगणभर घुमू लागले.

### वात्सल्याचा सागर कोरडा..

» नवऱ्या मुलाचे "आई गेली" हे शब्द कानावर पडताच घरात अश्रूंचा पूर आला. मुलाचे हात पिवळे करण्याचे स्वप्न अर्धवट राहिले. नियतीच्या निर्दयी फटकाऱ्याने फुलणाऱ्या प्रेमळ संसाराचा पाया हादरला. आशा गवळी यांच्या जाण्याने केवळ एक आई नाही, तर वात्सल्याचा अख्खा सागरच कोरडा पडल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

# 'Run For Unity' एकतेच्या उत्सवात आमदार शंकर जगताप यांचा सहभाग







**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि सांगवी पोलीस ठाणे यांच्या वतीने लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित 'एकता दौड' म्हणजेच RUN FOR UNITY मध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप हे देखील शहरवासीयांसोबत या एकतेच्या उत्सवात सहभागी झाले होते.

या उपक्रमाद्वारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशाच्या एकात्मतेचा, अभिमानाचा आणि राष्ट्रभावनेचा उत्सव साजरा करण्यात आला. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला बळ देत सर्व वयोगटातील नागरिक, विद्यार्थी, पोलीस अधिकारी आणि सामाजिक संस्थांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

याप्रसंगी आमदार शंकर जगताप म्हणाले की, लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अद्वितीय राष्ट्रनिर्मिती कार्याचे स्मरण करत, देशाच्या एकतेसाठी आणि विकासासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवावा. खरंतर 'RUN FOR UNITY' ही केवळ एक स्पर्धा नसून एकतेचा संकल्प आणि राष्ट्रभावनेचा उत्सव आहे, ही भावना या कार्यक्रमातून अधोरेखित झाली असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# महागाई लक्षात घेऊन निवडणुकीत खर्च मर्यादित वाढ; खर्च मर्यादा तेरा लाखांवर




**पिंपरी | प्रतिनीधी**

राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी उमेदवारांच्या खर्चमर्यादित मोठी वाढ जाहीर केली आहे. बुधवारी जारी आदेशानुसार, आधीपेक्षा दीडपट वाढ करत नव्या वर्गवारीनुसार मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका 'ब' वर्गात समाविष्ट असून, या वर्गातील उमेदवारांसाठी खर्चमर्यादा आता १३ लाख रुपये इतकी ठरविण्यात आली आहे. यापूर्वी ही मर्यादा सुमारे ७ ते ८ लाखांच्या दरम्यान होती.

नव्या नियमांनुसार मुंबई, पुणे आणि नागपूरसाठी १५ लाख रुपये, 'क' वर्गातील (कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार) महापालिकांसाठी ११ लाख, तर उर्वरित १९ महापालिकांसाठी ९ लाख रुपयांची मर्यादा निश्चित झाली आहे.

२०१७ मध्ये ही मर्यादा सदस्यसंख्येच्या आधारे ठरविण्यात आली होती. मात्र, आता महापालिकांची वर्गवारीनुसार विभागणी करून मर्यादा निश्चित केल्याने उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे, असे आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी कळविले आहे.

# विना निविदा व्यवसाय पुस्तक खरेदीचा घाट

## 'पुणे महानगर प्रदेश ग्रोथ हब'च्या माध्यमातून तयार होणारा आर्थिक विकास आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. परंतु महापालिकेच्या काही धोरणांमध्ये विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा ठेकेदाराच्या आर्थिक भल्याचा विचार केला जात आहे का अशी शंका येऊ लागली आहे. महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष संपण्यासाठी अवघे काही महिने राहिले असताना साडेचार कोटींचे पुरक आणि व्यवसाय पुस्तके विना निविदा खरेदी करण्याचा घाट महापालिका प्रशासनाने घातला आहे.

विशिष्ट प्रकाशकाच्या आर्थिक भल्यासाठी हा प्रस्ताव आणला जात असल्याची माहिती सुत्रांनी दिले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी हा प्रस्ताव मागिल स्थायी समितीच्या बैठकीत पुढे घेतला होता. आज शुक्रवारी (दि.३१) यावर स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय होणार आहे. पुणे महापालिकेच्या शाळेत इयत्ता दुसरी ते पाचवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, गणित इंग्रजी, बुधिमत्ता, संगणक या विषयांच्या लेखन सरावासाठी व्यवसाय पुस्तके खरेदीचा निर्णय महापालिका प्रशासाकडून घेण्यात येत आहे.

विशेष म्हणजे खरेदीमधील गैरव्यवहार टाळण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून आपण पुस्तके वह्या आणि गणवेश शालेय साहित्य यांच्या साठी लागणारे पैसे थेट पालकांच्या खात्यात जमा करत आहेत. खरेदीमधील गैरव्यवहाराला यामुळे आळा बसला आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना वेळेवर साहित्य मिळत आहे. महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखन सरावासाठी व्यवसाय पुस्तके हवी असल्याचे अचानकच ठरवण्यात आले. यासाठी काही मुख्यध्यापकांनी पुस्तके कशी असावी हे ठरवण्यात आले काही प्रकाशकांची पुस्तके यासाठी निवडण्यात आली. आता शैक्षणिक वर्ष संपत आले आहे. सहामाही परीक्षा सुध्दा संपल्या आहेत. असे असताना सराव पुस्तके देवून सुध्दा काहीच उपयोग होणार नाही. उलट प्रकाशकाना न खपलेली पुस्तके विकली जाणार आहेत.




### अशी पुस्तके अनेक प्रकाशक काढत असतात

» महापालिका प्रशासनाच्या म्हणण्यानुसार विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रकाशकांबरोबर बोलणी करुन डिस्काउंट जो प्रकाशक जास्त देईल त्याच्याकडून खरेदी निविदा न काढता करण्यात येणार आहे. मुख्यध्यापकांच्या समितीने ठरवल्याप्रमाणे या व्यवसाय पुस्तकांचा आराखडा आहे. असे प्रशासनाचे म्हणणे आहे. वास्तविक अशा प्रकारची पुस्तके अनेक प्रकाशक काढत असतात बाजारात सुध्दा अशी पुस्तके उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांची गुणवत्तेवर महापालिकेला खरोखर अधिक लक्ष द्यायचे असल्यास मुख्यध्यापकांनी अथवा तज्ञ शिक्षकांनी अशा प्रकारची पुस्तके तयार केली तर महापालिकेच्या मुद्रणालयातून महापालिका स्वत: तयार करु शकते. नवीन वर्ष सुरु झाल्यानंतर अशी पुस्तके सर्व इयत्तांना मिळू शकतात.

### सहामाही परीक्षाही संपल्या तर उपयोग काय?

» काही प्रकाशकांची पुस्तके यासाठी निवडण्यात आली. आता शैक्षणिक वर्ष संपत आले आहे. सहामाही परीक्षा सुध्दा संपल्या आहेत. असे असताना सराव पुस्तके देवून सुध्दा काहीच उपयोग होणार नाही. उलट प्रकाशकाना न खपलेली पुस्तके विकली जाणार आहेत. अशा प्रकारची पुस्तके बाजारात मोठ्याप्रमाणात मिळतात. यावर मोठा डिस्काउंड सुध्दा देण्यात येतो. महापालिकेला सुध्दा १५ ते २० टक्के डिस्काउंटची ऑफर देण्यात आली आहे. मात्र हा खटाटोप महापालिका प्रशासनाने प्रकाशकसाठी केला की विद्यार्थ्यांसाठी वर्ष संपत असताना असा प्रश्न निर्माण होत आहे.

> विद्यार्थ्यांना व्यवसाय पुस्तके द्यायची असल्यास निविदा काढूनच दिली पाहिजे. निविदा न काढता पुस्तके खरेदी करणे चुकीचे आहे. निविदा न काढता केलेली पुस्तके खरेदी बेकायदेशीर आहे.
>
> - विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच.

# वाहनांच्या सुट्ट्या भागांची सर्वाधिक वाहतूक... लॉजिस्टिक हब म्हणून ओळख

## पुणे विमानतळाचे दिवसेंदिवस होणार विस्तारीकरण, पायाभूत सुविधा आणि विमान उड्डाणांची संख्या यामुळे मालवाहतुकीलाही चालना मिळत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून नागरी उड्डाणांची सेवा वाढत असताना आता 'लॉजिस्टिक हब' म्हणून ओळख निर्माण होत आहे. मालवाहतुकीत दिवसेंदिवस वाढ होत असून, यंदा सप्टेंबर महिन्यात विमानतळावरून गेल्या वर्षीच्या तुलनेत ३३ टक्के अधिक म्हणजे ४,७९२.५ टन मालाची वाहतूक झाली आहे. गेल्या वर्षी या दिवसांत ३,६१२.२ टन मालवाहतूक झाली होती. प्रामुख्याने यामध्ये वाहनांच्या सुट्या भागांच्या ३० टक्क्यांहून अधिक साहित्याचा समावेश असल्याचे समोर आले आहे.

पुणे विमानतळाचे दिवसेंदिवस होणार विस्तारीकरण, पायाभूत सुविधा आणि विमान उड्डाणांची संख्या यामुळे मालवाहतुकीलाही चालना मिळत आहे. तसेच, सुस्थितीतील मालाची हाताळणी, पोहोचविण्याची प्रक्रिया, टर्मिनलवरील सुधारित सुविधा, साठवण क्षमतेसाठी विस्तारित गोदाम, विमान कंपन्यांचा प्रतिसाद, सीमाशुल्क, सुरक्षा यंत्रणा यांच्यातील उत्तम समन्वयामुळे शक्य होत असल्याची माहिती पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी दिली.

ढोके म्हणाले, 'सप्टेंबरपाठोपाठ ऑक्टोबर महिन्यातही मालवाहतुकीला चालना मिळाली आहे. २६ ऑक्टोबरपर्यंत विमानतळाने ४,०४० टन माल हाताळला असून, हा आकडा मागील वर्षीच्या संपूर्ण ऑक्टोबरमधील ४,३०९.७ टनांच्या जवळपास आहे. ऑक्टोबर महिन्यात सर्वाधिक १२ टक्के वाढ असल्याचे समोर आले आहे. यामध्ये प्रामुख्याने वाढ प्रामुख्याने वाहनांचे सुटे भाग (३० टक्के), नाशवंत वस्तू (२५ टक्के), ई-कॉमर्स (२० टक्के), टपाल सेवा (३ टक्के) आणि इतर मिश्र माल (२३ टक्के) झाली आहे.'

'विमानतळाचे विस्तारीकरण होत असून, लवकरच आणखी उड्डाणे आणि आंतरराष्ट्रीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्याची पश्चिम भारतातील प्रमुख 'लॉजिस्टिक हब' म्हणून ओळख निर्माण होईल. भविष्यात सणासुदीच्या काळात तंत्रज्ञानाधारित, अखंड मालवाहतूक सेवा देण्यावर आमचे लक्ष आहे,' असेही ढोके म्हणाले.




> विमानतळ प्राधिकरण (एएआय) पुणे विमानतळाच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करीत आहे. जेणेकरून मोठ्या क्षमतेची कार्यक्षम आणि शाश्वत हाताळणी शक्य होईल. नोव्हेंबर महिन्यापर्यंत मालवाहतुकीतीला चालना कायम राहील. यंदाच्या वर्षातील ही सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे.
>
> - संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ

# पानशेत-वरसगाव परिसरात बिबट्यांचा धुमाकूळ चार जनावरांचा बळी

## कशेडी, गोंडेखेल, मोसे बुद्रुक भागात बिबट्यांचा वाढता वावर; शेतकरी-गुराख्यांमध्ये भीतीचं वातावरण

**पुणे | प्रतिनिधी**

पानशेत आणि वरसगाव धरण परिसरातील कशेडी, गोंडेखेल व मोसे बुद्रुक भागात बिबट्यांचा धुमाकूळ सुरू आहे. बिबट्याने गेल्या 2 दिवसांत 4 जनावरांचा फडशा पाडला आहे. या घटनांमुळे स्थानिक शेतकरी आणि गुराख्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने पर्यटक व नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे.

बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांना संध्याकाळनंतर बाहेर पडणे धोकादायक ठरत आहे. या भागात वन विभागाने गस्त वाढवून शेतकऱ्यांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे, अशी माहिती वन परिमंडळ अधिकारी स्मिता अर्जुने यांनी दिली.

कशेडी येथील संतोष निवंगुणे यांची एक शेळी, मोसे बुद्रुक येथील जनाबाई ढेबे यांचे एक वासरू, बाबुराव बावधने यांचे रेडकू आणि गोंडेखेल येथील धावू मरगळे यांची एक शेळी असा एकूण चार जनावरांचा बिबट्यांनी फडशा पाडला आहे. वनरक्षक स्वप्निल उंबरकर व वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. सततच्या पावसामुळे पानशेतच्या जंगल परिसरात झाडे, झुडपे आणि गवत वाढल्याने बिबटे खाद्याच्या शोधात खेड्यांच्या आसपास दबा धरून बसत असल्याचे वन अधिकाऱ्यांचे निरीक्षण आहे.



### बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी

» कामठवाडी तसेच भुजबळ कामठवाडी, आंब्याचा मळा, सापिका या परिसरातील बहुतांश शेतीची कामे मागील आठवड्यापासून रखडली आहेत. वनविभाग मात्र याकडे सोईस्कर दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील ग्रामस्थांमधून होत आहे. लवकरात-लवकर या परिसरात पिंजरा लावून, बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी येथील ग्रामस्थ, शेतकरीवर्गाकडून करण्यात आली आहे.

शेतकरी चरण्यासाठी शेळ्या, गाई-वासरे मोकाट सोडत असल्याने बिबट्यांना सहज हल्ला करण्याची संधी मिळते. त्यामुळे ग्रामीण भागात व पर्यटकांनी मुख्य रस्त्याच्या बाहेर, जंगल परिसरात न जाण्याचे आवाहन पानशेत वन विभागातर्फे करण्यात आले आहे. दरम्यान, हल्ल्यात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी कोशीमघरचे उपसरपंच अक्षय कडू यांनी केली आहे.

आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर गावात बिबट्याच्या वावराने पुन्हा एकदा थरकाप उडवला आहे. वळसेमळा हद्दीत असलेल्या शेतकरी रामचंद्र ज्ञानेश्वर वळसे पाटील यांच्या घराच्या ओट्यावर बिबट्या अन्न-पाण्याच्या शोधात भटकंती करीत असल्याची घटना घराच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

ही घटना बुधवारी (दि. 29) पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास घडली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये बिबट्या अत्यंत शांतपणे घरासमोरच्या ओट्यावर फेरफटका मारताना स्पष्ट दिसत आहे. काही क्षण तो परिसरात थांबून पुन्हा अंधारात निघून गेला. यापूर्वीही दोनवेळा बिबट्या या परिसरात आल्याची पुष्टी शेतकरी रामचंद्र वळसे पाटील यांनी दिली असून, वारंवार होणाऱ्या बिबट्याच्या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### 'भय इथले संपत नाही'

» वाल्हे नजीक भुजबळ कामठवाडी (ता. पुरंदर) परिसरातील शेतातील विहिरीजवळ बिबट्याचे भर दुपारी दर्शन झाले. परिणामी परिसरातील ग्रामस्थ व शेतकरीवर्गामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी वनविभागाकडे तातडीने उपाययोजनांची मागणी केली आहे.

### अंगावर काटा आला होता : कोमल भुजबळ

» इतक्या जवळून बिबट्या पाहिल्याचा हा पहिलाच अनुभव होता. त्या क्षणी अंगावर काटा आला होता; मात्र घाबरून आरडाओरडा केल्यास काही विपरीत घडू शकते, हे लक्षात घेऊन मी गप्पच राहिले. पुढे काही अंतरावर लपून, चालत गेल्यावर तातडीने परिसरातील शेतकरीवर्गाला याची माहिती देत सावध केले, अशी माहिती कोमल भुजबळ यांनी दिली.

---

# बोरी-खोडद गटात उमेदवारीसाठी रस्सीखेच ; तिकीट मिळवणं हेच इच्छुकांपुढे आव्हान!

## जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी इच्छुकांची मोठी गर्दी; उमेदवारांच्या निवडीसाठी पक्षांचा कस लागणार

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील बोरी-खोडद गटात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविणे हेच इच्छुकांसमोर मोठे आव्हान ठरले आहे. बोरी-खोडद गट नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, तर बोरी बुद्रुक गण सर्वसाधारण आणि खोडद गण नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव झाल्यामुळे सध्या सर्वच राजकीय पक्षांच्या बैठका आणि पुढारी मंडळींच्या गाठीभेटी सुरू आहेत.

या नवीन गटात जिल्हा परिषदेसाठी तसेच पंचायत समितीसाठी इच्छुकांची संख्या खूप मोठी आहे, त्यामुळे चुरस वाढली आहे. इच्छुकांना प्रत्यक्ष निवडणुकीला सामोरे जाणे अवघड असल्याने पक्षांना उमेदवार निवडताना त्यांचा प्रत्येक गावातील जनसंपर्क, झालेली विकास कामे, पुढील विकासाचे नियोजन, परिसराची भौगोलिक रचना अशा सर्व गोष्टींची जाण असणाऱ्याचा विचार करणे गरजेचे ठरणार आहे.




बोरी बुद्रुक गणातून पंचायत समितीसाठी पारगाव, शिरोली, बोरी, औरंगपूर गावांना संधी मिळण्याची शक्यता असून खोडद गणात खोडद, वडगाव, बोरी बुद्रुक, कांदळी गावातून विद्यमान, माजी सरपंच किंवा तरुण नेतृत्वाला संधी मिळणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. जिल्हा परिषद गटासाठी पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या सून कविता संदीपान पवार, जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भास्कर गाडगे यांच्या पत्नी संगीता भास्कर गाडगे, बोरी खुर्दच्या सरपंच कल्पना वैभव काळे, वडगाव कांदळीच्या आदर्श सरपंच उल्का श्रीकांत पाचपुते यांसह अनेक महिला इच्छुक आहेत. ऐनवेळी पक्षाचे तिकीट कुणाला मिळते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. जुन्नर तालुक्यातील बोरी-खोडद गटात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविणे हेच इच्छुकांसमोर मोठे आव्हान ठरले आहे

### लढत राष्ट्रवादी-शिवसेना (उबाठा) पक्षात

» राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले असले तरी, बोरी-खोडद गटात खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यातच होईल, असे चित्र सध्या दिसत आहे. कोण कोणाच्या गळ्यात हात घालून निवडणुकीला सामोरे जाणार, हे पुढील काळच ठरवेल.